प्रेस नोट दि.१५/०५/२०१९

# मुंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## घरफोडी करणारी टोळी गजाआड

दि.०६/०५/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी मुंढवा पोलीस स्टेशन गु.र.नं.१३३/२०१९ भादवि कलम ४५७,३८० चे तपासाचे अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना हडपसर स्टेशन रोड येथे आले असता दोन इसम एका झाडाखाली मोटार सायकल घेवुन उभे असल्याचे दिसुन आले व ते कावरेबाव-या नजरेने आजु बाजुची टेहळणी करीत असल्याचे दिसले म्हणुन त्यांना त्यांचा संशय आल्याने त्यांना हटकताच ते तेथुन गाडी चालु करुन पळुन जाण्याच्या तयारीत असताना वरील स्टाफच्या मदतीने जागीच १२/३० वा सुमारास पकडुन त्यास त्यांचा नाव पत्ता विचारता त्यांनी प्रथम त्यांचे नाव पत्ते सांगण्यास टाळाटाळ करुन नंतर त्यांनी आपली नावे १) बिरजुसिंग रजपुतसिंग दुधानी वय ३५ वर्षे, रा, सर्वे नं.११०, अंध शाळेमागे, डोंगरावर रामटेकडी हडपसर पुणे. २) रविसिंग शाम सिंग कल्याणी वय २० वर्षे रा, सर्वे नं.११० रामटेकडी शिकलकर गल्ली हडपसर पुणे. असे असल्यचे सांगितले त्यांचेकडे अधिक तपास करता व त्यांचे पुर्व रेकॉर्डची पडताळणी करता आरोपी नं.१ यांचे विरुध्द पुणे शहरामध्ये एकुण १६ चोरी,घरफोडी सारखे गुन्हे दाखल असुन अनु.नं.२ याचे विरुध्द पुणे शहरामध्ये चोरी घरफोडी सारखे २६ गुन्हे दाखल असल्याची माहिती उपलब्ध झाल्याने त्यांचेकडे मुंढवा पोलीस स्टेशन कडील गुन्हा रजिस्टर नंबर १३३/२०१९ भादवि कलम ४५७,३८० बाबत तपास केला असता वर नमुद आरोपी यांनी सदरचा गुन्हा हा त्यांचा आणखी एक फरार साथीदार नामे पैथर ऊर्फ पवित्र सिंग गब्बरसिंग टाक रा,सर्वे.नं.११०, रामटेकडी अंधशाळेच्या पाठीमागे, डोंगरावर हडपसर पुणे. असे तिघांनी मिळुन केला असल्याचे कबुल केल्याने नमुद आरोपींना दि.०६/०५/२०१९ रोजी अटक करुन अधिक तपास केला असता १) लष्कर पोलीस स्टेशन गु.रं.नं.२१३/२०१९ भादवि कलम ३७९ २) भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ४८८/२०१९ भादवि कलम ४५७,३८० ३) निगडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ५५७/२०१९ भादवि कलम ४५७,३८०,३४ ४) विमानतळ पो.स्टे. गुन्हा रजिस्टर नंबर १९३/२०१९ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा केल्याचे कबुल केले असुन नमुद आरोपीकडुन वरील गुन्हयातील एक तवेरा मोटार कार, एक केटीएम मोटार सायकल, रोख ६,५००/- रुपये असा एकुण ६,८१,५००/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदर आरोपीतांचा मा.श्री. ए.बी. फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे, मा.श्री. सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, श्री, संपत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी, सहा पोलीस फौजदार सुरेश सोनवणे, पोहवा कैलास चव्हाण, पोना निलेश जगताप, अमोल गायकवाड, निलेश गायकवाड, अमोल चव्हाण, पोशि शाम शिंदे, श्रीनाथ जाधव, दिपक कांबळे,संदेश काकडे, सोमनाथ सावळकर यांनी आरोपींचा शोध घेऊन आरोपींना पकडुन उपरोक्त कामगिरी केली आहे.